महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,अलिबाग.जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No.02141-299214 www.gmchalibag.in

जा. क्र.शावैमअ/दरपत्रक/website/126/२०२४ दिनांक: १७/०१/२०२४

दरपत्रक मागणी पत्र

विषय: संस्थेचे संकेतस्थळ रिडीजाईन (website redesign) करण्यासाठी दरपत्रके मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत.

अलिबाग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सन २०२१—२२ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास शासनाने व राष्ट्रीय आयुर्विग्यान आयोग नवी दिल्ली,यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय आयुर्विग्यान आयोग, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार संस्थेची वेबसाइट रिडीजाईन (website redesign) करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील नमुन्यात मोहोरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| S.N. | Particulars | Unit price |
|---|---|---|
| 1 | Website redesign for www.gmchalibag.in | Including all taxes |

अ.नं.

१. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दिनांक २४/०१/२०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारत घेतले जाणार नाही/ग्राह्य धरले जाणार नाही.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग, जि.रायगड यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा, त्याचप्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यावर “Website redesign for www.gmchalibag.in करिता दरपत्रक” लिहून सादर करावे.

३. लिफाफ्यावर डाव्या बाजूस दरपत्रक लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का ई.नमूद असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रक ग्राह्य कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांक पासून १२ महिन्याचा राहील.

५. प्रस्थावित उद्दिष्टाकरीता दरपत्रक आकरण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रकचा विचार करण्यात येईल .

६. सदर उद्दिष्टाची किंमत, सर्व करांसह एकूण किंमत अशी दर्शवण्यात यावी. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

७. दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्ताएवज (documents)- अधिकृत लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे.१) दुकानाचा परवाना २) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र ३) जी.एस.टी. क्रमांक पत्र.

८. सदर काम इतर कोणत्याही शासकीय संस्थेस पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र असल्यास प्राध्यान्य.

९. ज्या पात्र दरपत्रक धारकाचे दर ही न्यूनतम असतील अशा यशस्वी दरपत्रक धारकास पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

१०. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशता बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द ई . अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता)यांनी राखून ठेवले आहेत.

११. काम पूर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयके ही अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि. रायगड यांच्या नावाने देण्यात यावेत.

१२. देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क अदा केले जाणार नाही.

१३. पुरवठा धारकाचे पूर्ण नाव, भ्रमणध्वनी आणि संपूर्ण पत्ता, ई-मेल, संकेतस्थळ हे लिफाफ्या वर नमूद असणे आवश्यक आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग, जि. रायगड.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड

प्रत: शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग, जि. रायगड यांच्या सूचनाफलकावर दरपत्रक मागविण्यासंदर्भात दिनांक १७/०१/२०२४ रोजी सूचना देण्यात आलेल्या आहेत.